25 वर्षे विकासाची
"माझे शहर, माझा अभिमान"

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.
दुरध्वनी क्र. 28192828/28193087.

जा.क्र.मनपा/आस्था/ २९८७ /2025-26 दि. 16/03/2026

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महापालिकेच्या महापौर दालनाकरिता वर्ग-01 व वर्ग-02 चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेबाबतची जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त महोदय यांची दि.26/02/2026 रोजीची मान्यता.

महापालिकेच्या महापौर दालनाकरिता वर्ग-01 व वर्ग-02 चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेबाबत जाहिर सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. (सोबत जाहिर सूचना छायांकित प्रत)

(डॉ.सचिन बांगर)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.


जा.क्र.मनपा/आस्था/ 2987/2025-26 दि. 16/03/2026

**महापालिकेच्या महापौर दालनाकरिता वर्ग-01 व वर्ग-02 चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेबाबत.**

**।।जाहीर सूचना।।**

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या महापौर दालनाकरिता वर्ग-01 व वर्ग-02 चे निवृत्त अधिकारी यांची मानधनावर ओ.एस.डी व पी.एस म्हणून नेमणूक करणेकरिता इच्छुक व पात्र उमेद्वारांची थेट मुलाखतीद्वारे निवड करण्यात येणार आहे. इच्छुक उमेद्वार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेले असणे आवश्यक आहे.

इच्छुक व पात्र उमेद्वारांनी दि. 24/03/2026 रोजी सकाळी 10.00 ते दुपारी 1.00 वाजेपर्यंत मा.स्थायी समिती सभागृह, दुसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) जि.ठाणे 401101 येथे प्रत्यक्ष मुलाखतीसाठी (Walk in Interview) उपस्थित राहावे.

**उपलब्ध पद संख्या**:- 02

| अ.क्र. | पदाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| 1. | विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) (वर्ग-01 व वर्ग-02) | 01 | शासकीय/निमशासकीय सेवेत (वर्ग-01) मधील पदावर किमान 05 वर्षे अथवा वर्ग-02 मधील पदावर 10 वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. |
| 2. | खाजगी सचिव (सेवानिवृत्त) (वर्ग-01 व वर्ग-02) | 01 | |

**अटी व शर्ती :-**

1) उमेदवार शासकीय, निमशासकीय सेवेमधुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2) ठोक मानधनावर नेमणूकीकरीता सेवानिवृत्त अधिकाऱ्याचे वय 70 वर्षापेक्षा अधिक नसावे.
3) ठोक मानधनावर नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या कोणत्याही संवर्गात सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.
4) विशेष कार्य अधिकारी (सेवानिवृत्त) व खाजगी सचिव (सेवानिवृत्त) या पदासाठी रक्कम रु.40,000/- प्रति महिना इतके मानधन अदा करण्यात येईल.
5) ठोक मानधनावर नियुक्त करावयाच्या सेवानिवृत्त अधिका-याविरुध्द विभागीय चौकशीची कारवाई चालु किंवा प्रस्तावित नसावी किंवा अशा चौकशी प्रकरणी कोणतीही शिक्षा झालेली नसावी.
6) उमेदवार शारीरिक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा, तसेच प्रस्तावित सेवेसाठी त्यांच्याकडे आवश्यक क्षमता असावी.



Scanned with OKEN Scanner

7) नियुक्तीसाठी सक्षम प्राधिकारी यांना विशेष परिस्थितीत कोणत्याही वेळी अशा अधिकाऱ्याच्या ठोक मानधनावरील सेवा समाप्त करण्याचे अधिकार राहतील.

8) आवश्यकते प्रमाणे कमी अथवा जादा पदे ठोक मानधनावर भरण्याबाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचा राहील.

**<u>निवड प्रक्रिया</u> :-**

**सेवानिवृत्त "विशेष कार्य अधिकारी व खाजगी सचिव" या पदासाठी उमेदवारांची मुलाखत घेऊन गुणानुक्रमे निवड करण्यात येईल.**

- **प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.**

**(डॉ.सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**(मा.आयुक्त यांचे मंजुरीने)**

Scanned with OKEN Scanner